# आहिल्यानगर महानगरपालिका,आहिल्यानगर-४१४००१

## नगरसचिव विभाग

## मा.प्रशासक आहिल्यानगर महानगरपालिका

नगरसचिव कार्यालय
प्रशासकीय इमारत, संभाजीनगर रोड,
आहिल्यानगर महानगरपालिका,
आहिल्यानगर-४१४००३

मा.स्थायी समितीची मान्यता आवश्यक असलेले मा.प्रशासक यांजकडेस निर्णयार्थ सादर करावयाचे विषय.

कार्यसूची :- ७४

दिनांक - १२/१२/२०२५

| अ.क्र | विषय क्र | विषय |
|---|---|---|
| १ | ६७८ | शहर पाणी पुरवठा योजने वरील प्रभाग समिती क्र.२ मधील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २०२५-२०२६ या सालाचे वार्षिक दर ठरविणे कामी ई निविदा क्र.११९०३७३-१ मधील प्राप्त दरास मान्यते बाबत |
| २ | ६७९ | शहर पाणी पुरवठा योजने वरील प्रभाग समिती क्र.३ मधील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २०२५-२०२६ या सालाचे वार्षिक दर ठरविणे कामी ई निविदा क्र.१२००८९४ -१ मधील प्राप्त दरास मान्यते बाबत |
| ३ | ६८० | शहर पाणी पुरवठा योजने वरील प्रभाग समिती क्र.४ मधील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २०२५-२०२६ या सालाचे वार्षिक दर ठरविणे कामी ई निविदा क्र.११८०३७३-५ -१ मधील प्राप्त दरास मान्यते बाबत |
| ४ | ६८१ | अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रातील वाहतूक व्यवस्था सुरळीत / नियंत्रित करणेच्या दृष्टीकोनातून पे ॲण्ड पार्क नो पार्कीग टोईग कामाची अंमलबजावणी करताना टोईंगच्या किंमतीमध्ये घट करणे बाबत. |
| ५ | ६८२ | अहिल्यानगर मनपाच्या मालकीच्या सर्जेपुरा सिटी सर्व्हे नं.६४६६,७५४७,७९८९ या ठिकाणी नाटयगृह व व्यावसायिक जागा जागा शॉपिंग कॉम्प्लेक्स विकसित करणे करिता Tender ID -२०२५ _ANMC _ १२२२०५०-१ च्या अनुषंगाने प्राप्त दरास मंजूरी मिळणे बाबत. |
| ६ | ६८३ | अहिल्यानगर महानगरपलिकेच्या बुरूडगांव स.नं.३४ या ठिकाणी मान्सून शेड विकसीत करणे करीता Tender ID -२०२५ _ANMC _ १२४७११६-१च्या अनुषंगाने प्राप्त दरास मंजूरी मिळणे बाबत. |
| ७ | ६८४ | अहिल्यानगर महानगरपालिके मधील सेवानिवृत्त उप अभियंता,श्री.सदाशिव तुकाराम रोहोकले यांची मानधनावर पुर्ननियुक्ती करणे बाबत. |

| | | |
|---|---|---|
| ८ | ६८५ | अहिल्यानगर महानगरपालिके मधील सेवानिवृत्त उप अभियंता,श्री.सुरेश कोंडीबा इथापे यांची मानधनावर पुर्ननियुक्ती करणे बाबत. |
| ९ | ६८६ | अहिल्यानगर महानगरपालिके मधील सेवानिवृत्त उप अभियंता,श्री.रार्जेद्र गजानन मेहेत्रे यांची मानधनावर पुर्ननियुक्ती करणे बाबत. |
| १० | ६८७ | अहिल्यानगर महानगरपालिके मधील सेवानिवृत्त उप अभियंता,श्री.महादेव द.काकडे यांची मानधनावर पुर्ननियुक्ती करणे बाबत. |
| ११ | ६८८ | स्वच्छ भारत (नागरी) २.० अभियानाशी निगडीत कामकाजाची क्षमता (CB) बांधणी करणे कामी त्रयस्थ संस्थेची नेमणूक करणे कामी प्राप्त दरास मंजूरी मिळणे बाबत |
| १२ | ६८९ | अहिल्यानगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील "कंत्राटी पध्दतीने भुयारी गटर्स नालेसफाई करणे " या लेखाशिर्षा मध्ये वाढीव तरतूद करणे बाबत. |
| १३ | ६९० | अहिल्यानगर महानगरपालिका प्र.क्र.०५ मधील गणेश चौक ते सिव्हील हाडको,भगत मळा येथे ११० एम.एम.व १६० एम.एम.व्यासाची HDPE पाईप लाईन टाकणे कामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मा.स्थायी समिती समोर अवलोकनार्थ सादर. |
| १४ | ६९१ | अहिल्यानगर महानगरपलिका सेवाप्रवेश नियम व आकृतीबंध २०१६ मध्ये सुधारणा दुरूस्ती व नवीन पदे व जादा / वाढीव पदे निर्माण करणे बाबत. |
| १५ | ६९२ | अहिल्यानगर महानगरपालिकेच्या अधिकृत विविध समाजमाध्यमांवर महानगरपालिकेच्या मार्फत होणा-या स्वच्छता मोहिम तसेच दिन विशेष,मा.शासनाच्या विविध योजना/ अभियान तसेच मनपाचे शास्ती माफी व इतर विविध उपक्रमांना दि.२२/१०/२०२४ ते ११/११/२०२५ या कालावधीत प्रसिध्दी दिले बाबतचे देयकास कार्योत्तर मंजूरी मिळणेस व त्यासाठी आलेल्या खर्चास मंजूरी मिळणे बाबत. |
| १६ | ६९३ | विकास भार निधीतून खर्च सन २४-२५ अंतर्गत ई नि क्र १२१९२९५-१,प्र.क्र.१ मधील नंदनवन नगर अंतर्गत भोस घर ते पाटकर घर या डि पी रस्ता विकवित करणे.निविदा मंजूरी बाबत. |

मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेने

सही/-
(मेहेर लहारे)
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**

**नगरसचिव विभाग**

**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -७४**

मा.प्रशासक ठराव क्र. ६७८ विषय क्र - ६७८

दिनांक :- १२/१२/२०२५ विभाग- पाणी पुरवठा विभाग

---

**विषय :-** शहर पाणी पुरवठा योजने वरील प्रभाग समिती क्र.२ मधील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २०२५-२०२६ या सालाचे वार्षिक दर ठरविणे कामी ई निविदा क्र.११९०३७३-१ मधील प्राप्त दरास मान्यते बाबत

--**--

**ठराव :-** विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, शहर पाणी पुरवठा योजने वरील प्रभाग समिती क्र. ०२ मधील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २०२५ - २०२६ या सालाचे वार्षिक दर ठरविणे या कामाची तृतीय ई निविदा क्र.११९०३७३-१ दि. १५/०५/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. तद्नुसार दि.२२/०५/२०२५ रोजी सदर निविदेचा स्क्रीनशॉट पाहिला असता त्याकरिता मे. अभिराज ट्रेडर्स अहिल्यानगर यांची एकच निविदा प्राप्त झाली. सदर निविदेच्या तांत्रिक लिफाफ्यातील तांत्रिक कागदपत्रांची छाननी दि. २०/०६/२०२५ रोजी मा. छाननी समिती समोर झाली असता मे. अभिराज ट्रेडर्स,अहिल्यानगर यांची कागदपत्रे यथायोग्य असल्याने आर्थिक लिफाफा उघडण्यात आला.

सदरहू प्राप्त दरांचे अवलोकन करून सन २०२३ - २०२४ चे दरांशी तुलना करण्यात आली. निविदाधारकाचे प्राप्त दर अवाजवी व जादाचे वाटत असल्याने निविदाधारक यांना दि.०७/०८/२०२५ रोजी वाटाघाटी साठी बोलविण्यात आले. निविदेतील दरांचा तपशिल तांत्रिक स्वरूपाचा असल्याने तसेच Item ची संख्या जास्तीचे असल्याने मा. जल अभियंता यांचेकडेच वाटाघाटी बाबत चर्चा झाली. वाटाघाटी दरम्यान मा. जल अभियंता यांचे दालनात दरांचे अवलोकन करून पुनश्चः कमीचे व सुधारीत दर महानगरपालिकेस देणे बाबत मे. अभिराज ट्रेडर्स यांना सुचित करण्यात आले. त्यानुसार दि. १९/०८/२०२५ रोजी मे. अभिराज ट्रेडर्स यांनी देकार कमी करून सुधारीत दर इकडेस सादर केले आहेत.

मे. अभिराज ट्रेडर्स, अहिल्यानगर यांचे कडून अंतीम रित्या सादर केलेले प्रस्तावातील दरास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

---

**निर्णय:-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक:एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपलिका

सही/-
(यशवंत डांगे)
मा. प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -७४**

मा.प्रशासक ठराव क्र. ६७९ विषय क्र - ६७९
दिनांक :- १२/१२/२०२५ विभाग- पाणी पुरवठा विभाग

---

**विषय :-** शहर पाणी पुरवठा योजने वरील प्रभाग समिती क्र.३ मधील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २०२५-२०२६ या सालाचे वार्षिक दर ठरविणे कामी ई निविदा क्र.१२००८९४-१ मधील प्राप्त दरास मान्यते बाबत

--**--

**ठराव :-** विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, शहर पाणी पुरवठा योजने वरील प्रभाग समिती क्र. ०३ मधील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २०२५ - २०२६ या सालाचे वार्षिक दर ठरविणे या कामाची तृतीय ई निविदा क्र.१२००८९४-१-१ दि. १६/०७/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. तद्नुसार दि.३१/०७/२०२५ रोजी सदर निविदेचा स्क्रीनशॉट पाहिला असता त्याकरिता मे.सुनिल सेवा,अहिल्यानगर यांची एकच निविदा प्राप्त झाली. सदर निविदेच्या तांत्रिक लिफाफ्यातील तांत्रिक कागदपत्रांची छाननी दि. २८/०८/२०२५ रोजी मा. छाननी समिती समोर झाली असता मे.सुनिल सेवा,अहिल्यानगर यांची कागदपत्रे यथायोग्य असल्याने आर्थिक लिफाफा उघडण्यात आला.

सदरहू प्राप्त दरांचे अवलोकन करून सन २०२३ - २०२४ चे दरांशी तुलना करण्यात आली. निविदाधारकाचे प्राप्त दर अवाजवी व जादाचे वाटत असल्याने निविदाधारक यांना दि.०३/०९/२०२५ रोजी वाटाघाटी साठी बोलविण्यात आले. निविदेतील दरांचा तपशिल तांत्रिक स्वरूपाचा असल्याने तसेच Item ची संख्या जास्तीचे असल्याने मा. जल अभियंता यांचेकडेच वाटाघाटी बाबत चर्चा झाली. वाटाघाटी दरम्यान मा. जल अभियंता यांचे दालनात दरांचे अवलोकन करून पुनश्चः कमीचे व सुधारीत दर महानगरपालिकेस देणे बाबत मे. सुनिल सेवा यांना सुचित करण्यात आले. त्यानुसार दि. ०१/१०/२०२५ रोजी मे. सुनिल सेवा यांनी देकार कमी करून सुधारीत दर इकडेस सादर केले आहेत.

मे.सुनिल सेवा, अहिल्यानगर यांचे कडून अंतीम रित्या सादर केलेले प्रस्तावातील दरास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

---

**निर्णय:-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक:एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपलिका

सही/-
(यशवंत डांगे)
मा. प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -७४**

मा.प्रशासक ठराव क्र. ६८० विषय क्र - ६८०
दिनांक :- १२/१२/२०२५ विभाग- पाणी पुरवठा विभाग

---

**विषय :-** शहर पाणी पुरवठा योजने वरील प्रभाग समिती क्र.४ मधील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २०२५-२०२६ या सालाचे वार्षिक दर ठरविणे कामी ई निविदा क्र.११८०३७३-५ मधील प्राप्त दरास मान्यते बाबात

**--**--**

**ठराव :-** विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, शहर पाणी पुरवठा योजने वरील प्रभाग समिती क्र. ०४ मधील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २०२५ - २०२६ या सालाचे वार्षिक दर ठरविणे या कामाची द्वितीय ई निविदा क्र.११८०३७३-५ दि. १५/०५/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. तद्नुसार दि.२२/०५/२०२५ रोजी सदर निविदेचा स्क्रीनशॉट पाहिला असता त्याकरिता मे.सुरज संदिप मोढवे, अहिल्यानगर यांची एकच निविदा प्राप्त झाली. सदर निविदेच्या तांत्रिक लिफाफ्यातील तांत्रिक कागदपत्रांची छाननी दि. २०/०६/२०२५ रोजी मा. छाननी समिती समोर झाली असता मे. सुरज संदिप मोढवे ,अहिल्यानगर यांची कागदपत्रे यथायोग्य असल्याने आर्थिक लिफाफा उघडण्यात आला.

सदरहू प्राप्त दरांचे अवलोकन करून सन २०२३ - २०२४ चे दरांशी तुलना करण्यात आली. निविदाधारकाचे प्राप्त दर अवाजवी व जादाचे वाटत असल्याने निविदाधारक यांना दि.०७/०८/२०२५ रोजी वाटाघाटी साठी बोलविण्यात आले. निविदेतील दरांचा तपशिल तांत्रिक स्वरूपाचा असल्याने तसेच Item ची संख्या जास्तीचे असल्याने मा. जल अभियंता यांचेकडेच वाटाघाटी बाबत चर्चा झाली. वाटाघाटी दरम्यान मा. जल अभियंता यांचे दालनात दरांचे अवलोकन करून पुनश्चः कमीचे व सुधारीत दर महानगरपालिकेस देणे बाबत मे. सुरज संदिप मोढवे यांना सुचित करण्यात आले. त्यानुसार दि. १९/०८/२०२५ रोजी मे. सुरज संदिप मोढवे यांनी देकार कमी करून सुधारीत दर इकडेस सादर केले आहेत.

मे. सुरज संदिप मोढवे,अहिल्यानगर यांचे कडून अंतीम रित्या सादर केलेले प्रस्तावातील दरास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकःएमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

सही/-
(यशवंत डांगे)
मा. प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -७४**

मा.प्रशासक ठराव क्र. ६८१ विषय क्र - ६८१
दिनांक :- १२/१२/२०२५ विभाग- पाणी पुरवठा विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रातील वाहतूक व्यवस्था सुरळीत / नियंत्रित करणेच्या दृष्टीकोनातून पे ॲण्ड पार्क, नो पार्कीग टोईंग कामाची अंमलबजावणी करताना टोईंगच्या किंमती सुधारीत करणे अनुषंगाने प्रस्ताव.

--**--

**ठराव :-** विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, दिग्वीजय एन्टप्रयाजेस अहिल्यानगर यांचे दिग्वीजय एन्टरप्रायजेस यांचे दि. ०९/१२/२०२५ अन्वये पत्र इकडेस प्राप्त झाले असून अहिल्यानगर दि. ०३/१२/२०२५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मा. आयुक्त सो यांनी टोईग पे ॲण्ड पार्क नो पार्कीगच्या कामाबाबतचे दर कमी करणे बाबत प्रस्ताव सादर करणे बाबत आदेशीत करण्यात आलेले आहे. त्या प्रमाणे दिग्वीजय एन्टप्रायजेस यांनी सुधारीत दर इकडेस कळवीले आहे.

TWO Wheeler towing - ५९० + GST

TWO Wheeler clamping - ३९० + GST

Four wheeler towing - ९८४ + GST

Four wheeler Clamping - ७४२ + GST

या प्रमाणे आम्हाला टोईग साठी येणार साठी येणार खर्च हा कायमस्वरूपी आहे. जसे की कर्मचारीचे वेतन इंधनाचा येणारा खर्च हा स्थिर आहे. हे दर कमी केले असता आम्ही जी रक्कम वार्षीक महानगरपालिकेस देण्यास बांधील आहोत त्यात ही थोडया प्रमाणात सवलत मिळावी तसेच आम्हाला शहरातील इतर वाहतुकीचे रस्ते आम्हाला वाढवुन मिळावे व आम्हाला कार्याचा कार्यकाळ आणखी पाच वर्षासाठी वाढवुन मिळावा व आमच्याकडुन महापलिकेला देण्यात येणारे रॉयल्टीचे दर पहिले वर्ष १,००,००० रूपये दुसरे वर्ष १,२५,०००/- तिसरे वर्ष १,५०,०००/- चौथे वर्ष १,७५,०००/- पाचवे वर्ष २,००,०००/- या दराप्रमाणे सवलत मिळावी ही विनंती केलेली आहे.

या अनुषंगाने अहवाल सादर की, विषयांकीत कामी अहिल्यानगर महानगरपालिकेकडे प्राप्त तक्रारी/ निवेदन अनुषंगाने मा. आयुक्त यांचे दालनात मे. दिग्वीजय एन्टरप्रयाजेस. अहिल्यानगर यांचे उपस्थितीत दि. ०३/१२/२०२५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मा. आयुक्त यांनी

आदेशीत केल्याप्रमाणे मे. दिग्वीजय एन्टरप्रायजेस, अहिल्यानगर यांना प्रस्तावातील दरास मंजूरी बाबत विभागाने प्रस्तावित केले आहे.

अ) TWO Wheeler, Four wheeler towing & clamping चे सुधारीत दर

| | | |
|---|---|---|
| १ | TWO Wheeler towing | ३००/- +GST सह |
| २ | TWO Wheeler clamping | २५०/- +GST सह |
| ३ | Four wheeler towing | ६००/- +GST सह |
| ४ | Four wheeler Clamping | ५००/- +GST सह |

**ब) I - पे - ॲण्ड पार्क वाहनतळे-**

मे. दिग्विजय एंटरप्रायजेस, नाशिक यांचेकडील दि. ०१/०८/२०२५ व

दि ०५/०८/२०२५ तसेच दि. २२/०८/२०२५ रोजीचे पत्रान्वये पे ॲण्ड पार्क वाहनतळा करिता खालील वाहनतळे वाढवुण देण्यात येत आहे.

१) अंहिसा चौक ते आनंदधाम चौक( ४w, २w )

२) अंहिसा चौक ते चाणक्य चौक ( ४w, २w )

३) प्रेमदान चौक ते एस. आर पंप ( ४w, २w )

४) पारीजात चौक ते सुरभि हॉस्पीटल ( ४w, २w )

५) कृष्ठधाम चौक कलानगर चौक गुलमाहेर रोड ( ४w, २w )

६) कापडबाजार- मदुरा क्लॉथ ते हनुमान मंदिर सर्जेपुरा ( ४w, २w )

७) सर्जेपुरा हनुमान मंदिर ते अप्पु हत्ती चौक ( ४w, २w )

८) घास गल्ली ( Center line only ) ( २w)

**ब) II - नो पार्कींग वाहनतळे**

१) आनंदधम चौकच्या २५ मीटर आजूबाजूचा परिसर

२) अहिंसा चौकाच्या २५ मीटर आजूबाजूचा परिसर

३) चाणक्य चौकच्या २५ मीटर आजूबाजूचा परिसर

४) माहात्मा फुले चौकाच्या २५ मीटर आजूबाजूचा परिसर

५) पाटील हॉस्पीटल चौकाच्या २५ मीटर आजूबाजूचा परिसर

६) एस्सार पेट्रोल पंप व बालिकश्रम चौकाच्या २५ मीटर आजूबाूचा परिसर

७) सुरभी हॉस्पीटल चौकच्या २५ मीटर आजूबाजूचा परिसर

८) पारीजात चौकाच्या २५ मीटर आजूबाजूचा परिसर

९) गुलमोहर पोलीस चौकीच्या २५ मीटर आजूबाजूस परिसर

१०) आर्युवेद कॉलेज चौकाच्या २५ मीटर आजूबाजूचा परिसर

११) आमर धाम चौकाच्या २५ मीटर आजूबाजूचा परिसर

१२)मोची गल्ली रोड

**क) रॉयल्टीची सुधारीत रक्कम**

| अ न | वर्ष | रॉयल्टीची सुधारीत रक्कम |
|---|---|---|
| १ | **पहिले वर्ष** | **रू. १,००,०००/-** |
| २ | **दुसरे वर्ष** | **रू.१,२५,०००/-** |
| ३ | **तीसरे वर्ष** | **रू.१,५०,०००/-** |
| ४ | **चौथे वर्ष** | **रू.१,७५,०००/-** |
| ५ | **पाचवे वर्ष** | **रू.२,००,०००/-** |

वरील प्रमाणे अ, ब व क च्या सुधारीत प्रस्तावा प्रमाणे आकारणी करणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. "ब " बाबत हरकती / सुचना मागवाव्यात व तद्नंतर कार्यचाही करावी.

सदर निर्णय दि. ०१/०१/२०२६ पासून आमंलात आणण्यात यावा.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक:एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपलिका

सही/-
(यशवंत डांगे)
मा. प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
## मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय

**कार्यसूची क्रमांक -७४**

मा.प्रशासक ठराव क्र. ६८२ विषय क्र - ६८२
दिनांक :- १२/१२/२०२५ विभाग- प्रकल्प विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर मनपाच्या मालकीच्या सर्जेपुरा सिटी सर्व्हे नं.६४६६,७५४७,७९८९ या ठिकाणी नाटयगृह व व्यावसायिक जागा शॉपिंग कॉम्प्लेक्स विकसित करणे करिता Tender ID -२०२५ _ANMC _ १२२२०५०-१ च्या अनुषंगाने प्राप्त दरास मंजूरी मिळणे बाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, अहिल्यानगर मनपाच्या मालकीच्या सर्जेपुरा सिटी सर्व्हे नं.६४६६,७५४७,७१८९ या ठिकाणी नाट्यगृह व व्यावसायिक जागा/ शॉपिंग कॉम्प्लेक्स विकसित करणे करीता Tender ID_२०२५_ANMC_१२२२०५०_१ अन्वये ई- निविदा मागविण्यात आली आहे.

सदर बाबत तांत्रिक छाननी समितीने दि.०१/१२/२०२५ रोजी निविदेमध्ये प्राप्त झालेल्या दोनही निविदाधारकांच्या तांत्रिक लिफाफ्यामधील कागदपत्रांची छाननी केली असता दोनही निविदाधारकाने आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा व्यापारी उघडणे बाबत शिफारस केली. त्यानुसार दोनही निविदाधारकांचा व्यापारी उघडण्यात आला त्याचा तपशिल खालील प्रमाणे

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | निविदा रक्कम | निविदाकाराने निविदेमध्ये नमुद केलेले दर |
|---|---|---|---|
| १ | गांधी कंस्ट्रक्शन, शिरुर | रु.२६,७६,७७,९३६/- | निविदा रक्कमे पेक्षा ७.२९% जादा |
| २ | श्री सुधिर विठ्ठलराव कातोरे | रु.२६,७६,७७,९३६/- | निविदा रक्कमे पेक्षा १०.७७% जादा |

वरील दोनही निविदाधारकांच्या व्यापारी लिफाफ्याचे सविस्तर मूल्यांकन करून प्राप्त दरांबाबत आपला स्वयंस्पष्ट अभिप्राय इकडेस देणे बाबत स्पॅनेक्स एईसी सोल्युशन प्रा.लि, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना संदर्भ क्र. २ अन्वये कळविण्यात आले. निविदाधारकांचे निविदेतील व्यापारी लिफाफामधील दर अवाजवी आहेत. त्यामुळे वाटाघाटीसाठी बोलविणे असा अभिप्राय स्पॅनेक्स एईसी सोल्युशन प्रा.लि यांनी दिला आहे.

त्यानुसार वरील तक्ता पहाता तुलनात्मक दृष्ट्या गांधी कंस्ट्रक्शन, शिरुर यांचे दर कमी आहेत. परंतु अवाजवी असल्याने गांधी कंस्ट्रक्शन, शिरुर यांना सदर दराचे वाटाघाटी दिनांक ०९/१२/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता मनपा कार्यालयात बोलविण्यात आले. यावेळी मा. आयुक्त तथा प्रशासक, मा.उपायुक्त, मा. मुख्य लेखा परिक्षक, मा. मुख्यलेखाधिकारी व मा. उप अभियंता उपस्थित होते. सदरचे काम हे निविदा दरानेच करणेसाठी गांधी कंस्ट्रक्शन, शिरुर यांना सुचित करण्यात आले. सदर बैठकीमध्ये वाटाघाटी अंती गांधी कंस्ट्रक्शन, शिरुर यांनी पत्र देवुन सदरची साईट ही शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आहे. सदर निविदेमधील दर सन २०२२-२३ डिएसआरचे असुन दोन वर्ष जुने आहेत व दोन वर्षात मटेरीयल दरामध्ये वाढ झाली आहे. सदर निविदेमध्ये Price Escalation Clause ची तरतुद नाही.

वरील कारणास्तव निविदेमधील नमुद केलेले दर ७.२९% जादा, कमी करुन वाटाघाटी अंती ४.९५% जादा दराने काम करणेस तयार असले बाबत संदर्भ क्र.५ अन्वये कळविले आहे.

करीता अहिल्यानगर मनपाच्या मालकीच्या सर्जेपुरा सिटी सर्व्हे नं.६४६६,७५४७,७१८९ या ठिकाणी नाट्यगृह व व्यावसायिक जागा/शॉपिंग कॉम्प्लेक्स विकसित करणे करीता गांधी कंस्ट्रक्शन,शिरुर यांच्या वाटाघाटी अंती निविदा रक्कमे पेक्षा ४.९५% जादा दराच्या प्रस्तावातील दरास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकःएमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | यही/- |
| (मेहेर लहारे ) | (यशवंत डांगे) |
| प्र. नगरसचिव | मा. प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपलिका | अहिल्यानगर महानगरपालिका |

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -७४**

मा.प्रशासक ठराव क्र. ६८३ विषय क्र - ६८३
दिनांक :- १२/१२/२०२५ विभाग- प्रकल्प विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपलिकेच्या बुरूडगांव स.नं.३४ या ठिकाणी मान्सून शेड विकसीत करणे करीता Tender ID -२०२५ _ANMC _ १२४७११६-१च्या अनुषंगाने प्राप्त दरास मंजूरी मिळणे बाबत.

**--**--**

**ठराव :-** विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार,अहिल्यानगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४ या ठिकाणी मान्सूम शेड विकसीत करणे करीता Tender ID -२०२५ _ANMC _ १२४७११६-१ अन्वये ई निविदा मागविण्यात आली.

सदर बाबत तांत्रिक छाननी समितीने दि.०१/१२/२०२५ रोजी निविदेमध्ये प्राप्त झालेल्या दोनही निविदाधारकांच्या तांत्रिक लिफाफ्यामधील कागदपत्रांची छाननी केली असता दोनही निविदाधारकाने आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा व्यापारी लिफाफा उघडणे बाबत शिफारस केली. त्यानुसार दोनही निविदाधारकांचा व्यापारी लिफाफा उघडण्यात आला त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदा रक्कम | निविदाधारकाने निविदेमध्ये नमुद केलेले दर |
|---|---|---|---|
| १ | ओम साई कंन्स्ट्रक्शन, अहिल्यानगर | ७,५८,८४,६३६/- | निविदा रकमेपेक्षा १३% जादा |
| २ | गांधी कंन्स्ट्रक्शन,शिरूर | ७,५८,८४,६३६/- | निविदा रकमेपेक्षा १५% जादा |

वरील दोन्ही निविदाधारकांच्या व्यापारी लिफाफ्याचे सविस्तर मूल्यांकन करून प्राप्त दरांबाबत आपला स्वयंस्पष्ट अभिप्राय इकडेस देणे बाबत अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था,प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना कळविण्यात आले. निविदाधारकाने निविदेच्या व्यापारी लिफाफा मधील दर अवाजवी आहेत. सविस्तर विश्लेषन घेवून वाटाघाटीसाठी बोलविणे असा अभिप्राय अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांनी दिला आहे.

त्यानुसार वरील तक्ता पहाता तुलनात्मक दृष्टया ओम साई कंन्स्ट्रक्शन,अहिल्यानगर यांचे दर कमी आहेत. परंतु अवाजवी असल्याने ओम साई कंन्स्ट्रक्शन,अहिल्यानगर यांना सदर दराचे वाटाघाटी करिता बोलविण्यात आले.सदर काम हे निविदा दरानेच करणेसाठी साई कंन्स्ट्रक्शन,अहिल्यानगर यांना सुचित करण्यात आले.

सदर बैठकीमध्ये वाटाघाटी अंती ओम साई कंन्स्ट्रक्शन,अहिल्यानगर यांनी पत्र दिले असून सदर निविदा हि १३% जादा दराने भरली असून सदर निविदाचे DSR २०२२-२३ चा असून जुना रेट आहे. सदर रेट मध्ये कुठलेही बदल झाले नसुन आज पर्यत नविन DSR झालेला नाही. सदर वर्क हे फॅब्रेटिकेशनचे असल्याने शेडचे मटेरिअल बनवणे हे कचरा डेपो वर शक्य नसल्याने सदर कामाचे मटेरिअल हे साईट वर न बनवता बाहेर शॉप वर बनवणे व ते मटेरिअल ट्रान्सपोर्ट ने साईट वर आणणे व इनस्टॉल करणे या कामाचा खर्च डबल होत असल्याने मला जास्त खर्च येत असल्याने सदर मिटींग मध्ये चर्चा झाली असल्याने मी ४% दराने काम करण्यास तयार असलेबाबत कळविले आहे.

प्रस्तावातील नमुद अहिल्यानगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४ या ठिकाणी मान्सून शेड विकसीत करणे करिता ओम साई कंन्स्ट्रक्शन,अहिल्यानगर यांच्या वाटाघाटी अंती निविदा रक्कमे पेक्षा ४ % जादा दराच्या प्रस्तावातील दरास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

------------------ ------------------------------------------------------------------------------------------------------------

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकःएमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (मेहेर लहारे ) | (यशवंत डांगे) |
| प्र. नगरसचिव | मा. प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपलिका | अहिल्यानगर महानगरपालिका |

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**

**नगरसचिव विभाग**

**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -७४**

मा.प्रशासक ठराव क्र. ६८४ विषय क्र - ६८४

दिनांक :- १२/१२/२०२५ विभाग- पाणी पुरवठा विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिके मधील सेवानिवृत्त उप अभियंता,श्री.सदाशिव तुकाराम रोहोकले यांची मानधनावर पुर्नेनियुक्ती करणे बाबत.

**संदर्भ :-** ई प्रणाली फाईक क्र.२८३८०६७ अन्वयेचा मान्यता प्रस्ताव

**--**--**

**ठराव :-** विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार,अहिल्यानगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागासाठी स्थापत्य विषयक कामासाठी अभियंत्यांची निकड पहाता अहिल्यानगर महानगरपालिकेतील सेवानिवृत्त उप अभियंता श्री.सदाशिव तुकाराम रोहोकले यांची मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्यात आलेली असून सदर नियुक्तीची मुदत संपल्यानंतर त्यांना तीन दिवसांचा तांत्रीक खंड देवून अभियंता यापदी पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द नियुक्ती करण्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकःएमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपलिका

सही/-
(यशवंत डांगे)
मा. प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -७४**

मा.प्रशासक ठराव क्र. ६८५ | विषय क्र - ६८५
दिनांक :- १२/१२/२०२५ | विभाग- अतिक्रमण निर्मुलन विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिके मधील सेवानिवृत्त उप अभियंता,श्री.सुरेश कोंडीबा इथापे यांची मानधनावर पुर्ननियुक्ती करणे बाबत.

**संदर्भ :-** ई प्रणाली फाईक क्र.२४४३१५४ अन्वयेचा मान्यता प्रस्ताव

**--**--**

**ठराव :- :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, अहिल्यानगर महानगरपालिका सेवानिवृत्त उप अभियंता श्री.सुरेश कोंडीबा इथापे यांची तात्पुरत्या स्वरूपात केलेल्या नियुक्तीची मुदत संपत असल्याने त्यांची नियुक्तीची मुदत संपल्यानंतर उप अभियांता (स्थापत्य ) यापदी तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता तात्पुरत्या स्वरूपात एकत्रीत मानधनावर पुर्ननियुक्ती करण्यास मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकःएमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपलिका

सही/-
(यशवंत डांगे)
मा. प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -७४**

मा.प्रशासक ठराव क्र. ६८६ विषय क्र - ६८६
दिनांक :- १२/१२/२०२५ विभाग- प्रकल्प विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिके मधील सेवानिवृत्त उप अभियंता,श्री.राजेंद्र गजानन मेहेत्रे यांची मानधनावर पुर्ननियुक्ती करणे बाबत.

**संदर्भ :-** ई प्रणाली फाईक क्र.२८२४५१२ अन्वयेचा मान्यता प्रस्ताव

--**--

**ठरावः-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, अहिल्यानगर महानगरपालिका सेवानिवृत्त उप अभियंता श्री. राजेंद्र गजानन मेहेत्रे यांची तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर केलेल्या नियुक्तीची मुदत संपत असल्याने त्यांच्या नियुक्तीची मुदत संपल्यानंतर उप अभियांता (स्थापत्य ) यापदी तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता तात्पुरत्या स्वरूपात एकत्रीत मानधनावर पुर्ननियुक्ती करण्यास मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकःएमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपलिका

सही/-
(यशवंत डांगे)
मा. प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -७४**

मा.प्रशासक ठराव क्र. ६८७ विषय क्र - ६८७
दिनांक :- १२/१२/२०२५ विभाग- बांधकाम विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिके मधील सेवानिवृत्त उप अभियंता,श्री.महादेव द.काकडे यांची मानधनावर पुर्ननियुक्ती करणे बाबत.

**संदर्भ :-** ई प्रणाली फाईक क्र.२१०८४७१ अन्वयेचा मान्यता प्रस्ताव

--**--

**ठरावः-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, अहिल्यानगर महानगरपालिका सेवानिवृत्त उप अभियंता श्री.महादेव द.काकडे यांची तात्पुरत्या स्वरूपात केलेल्या नियुक्तीची मुदत संपत असल्याने त्यांची नियुक्तीची मुदत संपल्यानंतर उप अभियांता (स्थापत्य )यापदी तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता तात्पुरत्या स्वरूपात एकत्रीत मानधनावर पुर्ननियुक्ती करण्यास मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकःएमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपलिका

सही/-
(यशवंत डांगे)
मा. प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**

**नगरसचिव विभाग**

**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -७४**

मा.प्रशासक ठराव क्र. ६८८ विषय क्र - ६८८

दिनांक :- १२/१२/२०२५ विभाग- घनकचरा व्यवस्थापन विभाग

---

**विषय :-** स्वच्छ भारत (नागरी) २.० अभियानाशी निगडीत कामकाजाची क्षमता (CB) बांधणी करणे कामी त्रयस्थ संस्थेची नेमणूक करणे कामी प्राप्त दरास मंजूरी मिळणे बाबत

--**--

**ठराव :-** विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, अहिल्यानगर शहरात स्वच्छ भारत (नागरी) २.० अभियानाशी निगडीत कामकाजाची क्षमता बांधणी करणेकामी सक्षम त्रयस्थ संस्थची नेमणूक करणे आवश्यक होते.

त्याप्रमाणे निविदा मा.शासनाच्या GeM पोर्टलवर Bid No GEM/२०२५ /B/६९१९१५५प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर निविदेमधील तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रांची छाननी केली असता खालील प्रमाणे संस्था पात्र ठरल्या आहेत.

१.यंगमार्वल सर्व्हिसेस एलएलपी,मालेगांव

२.माउत्ली सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था मर्या.आष्टी

३.टेकट्विक्स्ट सर्व्हिसेस ॲण्ड टेक्नॉलॉजिस एलएलपी,कल्याण

वरील प्रमाणे संस्था पात्र ठरत असून मा.छाननी समितीच्या निर्णयानुसार सदर पात्र ठरलेल्या संस्थांचे व्यापारी लिलाफे GeM पोर्टलवर उघडले आसता मे. यंगमार्व्हल सर्व्हिर्सेस एल.एल.पी. मालेगाव यांचे रू. ९९,८७,२००/- दर प्राप्त झालेले आहेत. सदर संस्थेकडून खालीलप्रमाणे काम करून घेण्यात येणार आहे.

| Sr.No. | Traning Categories | Cost per participant per Traninig Session |
|---|---|---|
| 1 | sanitary worker ( sweeping staff ) | Rs.1800/- per participant per training |
| 2 | sanitary worker ( Gattar Cleaning staff ) | Rs.1800/- Per participant per Traning Session |
| 3 | sanitary worker ( septic tank cleaning ) | Rs.2200/- per Participant per Traning Session |
| 4 | sanitary inspector & supervisor ( CSI, SI,& mukadam ) | Rs.3200/- Per Participant per Traning Session |
| 5 | BWG'S | Rs.2500/- per Participant per Traning Session |
| 6 | Waste Pickers | Rs.2200/- per participant per Traning Session |
| 7 | Swachhata Volunteer | Rs.2500/- per participant per Training session |

| | | |
|---|---|---|
| 8 | Slef Help Groups | Rs.2000/- per Participant per Traning Session |
| 9 | Processing Plant Incharge/ engineer, Sanitary Inspector, Supervisor,Processing Plant Operator, Supervisor, Co- Worker etc | Rs.2500/- per Participant per Tranining Session |
| 10 | Organiing Exhibitons ( swachhataa Mohatsav ) | Rs.495600/- per day |
| 11 | Municipal Commisioner, Deputy Muncipal Commisioner, Assistant Commissioner, HOD, sanitary Inspector etc. | Rs.7500/- per person per day |
| 12 | Organiing Heath camp | Rs. 1040/- per Person |

मे. यंगमार्वल सर्व्हिसेस एल.एल.पी. ,मालेगांव या संस्थेचे दर लघुत्तम असल्याने मा.शासनाच्या GeM पोर्टलवर Bid No GEM/२०२५ /B/६९१९१५५ मधील, अहिल्यानगर शहरात स्वच्छ भारत (नागरी) २.० अभियानाशी निगडीत कामकाजाची क्षमता बांधणी करणेकामी सक्षम त्रयस्थ संस्थेची नेमणूक करणेकामी मे. यंगमार्वल सर्व्हिसेस एल.एल.पी. ,मालेगांव यांच्या प्रस्तावातील दरास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक:एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपलिका

सही/-
(यशवंत डांगे)
मा. प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
## मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय

**कार्यसूची क्रमांक -७४**

मा.प्रशासक ठराव क्र. ६८९ विषय क्र - ६८९
दिनांक :- १२/१२/२०२५ विभाग- घनकचरा व्यवस्थापन विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील "कंत्राटी पध्दतीने भुयारी गटर्स नालेसफाई करणे " या लेखाशिर्षा मध्ये वाढीव तरतूद करणे बाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, अहिल्यानगर महानगरपालिका अर्थसंकल्प सन २०२५-२०२६ मंजूर झालेला असून त्यामध्ये घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता "कंत्राटी पध्दतीने भुयारी गटर्स, नाले सफाई करणे " या लेखाशिर्षामध्ये रक्कम रू.३० लक्षची तरतूद करण्यात आलेली होती. सदर लेखाशिर्षामधून घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत पावसाळयापूर्वी करावयाच्या उपाययोजने करीता खाजगी संस्थेमार्फत मजुर उपलब्ध करून घेवून नालेसफाई चे कामकाज करून घेण्यात आलेले आहे. सदरचे काम या लेखाशिर्षामधून करण्यात आले आहे.

तथापी,सदर लेखाशिर्षामध्ये एकुण तरतूद रक्कम रू.३० लक्ष अशी करण्यात आलेली होती. सदर तरतूदीमधून नालेसफाई कामी नियुक्त करण्यात आलेल्या मे.अंबादास रामदास चौधरी,अहिल्यानगर या संस्थेचे एकुण देयक रक्कम रू.४१,४६,३४०/-इतक्या रकमेचे सादर केलेले आहे. त्यापैकी कंत्राटी पध्दतीने "भुयारी गटर्स, नाले सफाई करणे " या लेखाशिर्षा मध्ये एकुण तरतूद रू.३० लक्षची असल्यामुळे उर्वरीत रक्कम रू.१२,४६,३४०/- अदा करणे शिल्लक आहे.

"कंत्राटी पध्दतीने भुयारी गटर्स, नाले सफाई करणे " या लेखाशिर्षामध्ये रक्कम रू.१३ लक्षची वाढीव तरतूद करणे आवश्यक आहे. सदर लेखाशिर्षामध्ये खालील तक्त्यामध्ये दर्शविल्यानुसार लेखाशिर्षामधून

| अ.क्र. | लेखाशिर्ष | एकुण तरतुद | खर्च | शिल्लक | वजा रक्कम रू |
|---|---|---|---|---|---|
| १ | कंटेनर,कॉम्पॅक्टर,डेपरप्लेसर इत्यादी दुरूस्ती करणे | १२,००,०००/- | निरंक | १२,००,०००/- | रू.६,००,०००/- |
| २ | सार्वजनिक शौचालय देखभाल व दुरूस्ती | २५,००,०००/- | निरंक | २५,००,०००/- | रू७,००,०००/- |

उपरोक्त प्रमाणे "कंटेनर,कॉम्पॅक्टर,डेपरप्लेसर इत्यादी दुरूस्ती करणे " या लेखाशिर्षा मधून रक्कम रू.६ लक्ष व " सार्वजनिक शौचालय देखभाल व दुरूस्ती " या लेखाशिर्ष मधून रक्कम रू.७ लक्ष रूपये वजा करून "भुयारी गटर्स, नाले सफाई करणे " या लेखाशिर्षा मध्ये एकुण रक्कम रू. १३ लक्षची वाढ करणे बाबत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ या नमुना क्रमांक १० नियम ३० (३) नुसार अहिल्यानगर महानगरपालिका

अहिल्यानगर सन २०२५-२०२६ चे सादर केलेले पुनर्विनियोजन अंदाजपत्रक करणेस मा.प्रशासक यांची शिफारस करण्यात येत आहे. अखेर मंजूरीस्तव मा.सर्वसाधारण सभे समोर ठेवणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकःएमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (मेहेर लहारे ) | (यशवंत डांगे) |
| प्र. नगरसचिव | मा. प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपलिका | अहिल्यानगर महानगरपालिका |

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -७४**

मा.प्रशासक ठराव क्र. ६९० — विषय क्र - ६९०
दिनांक :- १२/१२/२०२५ — विभाग- पाणी पुरवठा विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका प्र.क्र.०५ मधील गणेश चौक ते सिव्हील हाडको,भगत मळा येथे ११० एम.एम.व १६० एम.एम.व्यासाची HDPE पाईप लाईन टाकणे कामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मा.स्थायी समिती समोर अवलोकनार्थ सादर.

--**--

**ठराव :-** विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, अहिल्यानगर महानगरपालिका प्र.क्र.०५ मधील गणेश चौक ते सिव्हील हाडको,भगत मळा येथे ११० एम.एम.व १६० एम.एम.व्यासाची HDPE पाईप लाईन टाकणे कामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मा.प्रशासकीय स्थायी समितीस अवलोकन झाले. मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकःएमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपलिका

सही/-
(यशवंत डांगे)
मा. प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -७४**

मा.प्रशासक ठराव क्र. ६९२ विषय क्र - ६९२
दिनांक :- १२/१२/२०२५ विभाग- प्रसिध्दी विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या अधिकृत विविध समाजमाध्यमांवर महानगरपालिकेच्या मार्फत होणा-या स्वच्छता मोहिम तसेच दिन विशेष,मा.शासनाच्या विविध योजना/ अभियान तसेच मनपाचे शास्ती माफी व इतर विविध उपक्रमांना दि.२२/१०/२०२४ ते ११/११/२०२५ या कालावधीत प्रसिध्दी दिले बाबतचे देयकास कार्योत्तर मंजूरी मिळणेस व त्यासाठी आलेल्या खर्चास मंजूरी मिळणे बाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार,मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे सुचनेनुसार अहिल्यानगर महानगरपालिकेच्या अधिकृत विविध समाजमाध्यमांवर महानगरपालिकेच्या मार्फत होणा-या स्वच्छता मोहिम तसेच दिन विशेष ,मा.शासनाच्या विविध योजना / अभियान तसेच महानगरपालिकेचे शास्ती माफी व इतर विविध स्तरावर चर्चा झाली असता यापुर्वी अशाप्रकारचे समाजमाध्यमांवर प्रसिध्दीचे काम मे.डिझ ाईन बाईट या संस्थेने केल्याचे निदर्शनास आले असून सदर संस्थेस महानगरपालिकेचे काम केल्याचा दांडगा अनुभव आहे. त्यानुसार वरील कामे हे तातडीने व विहित कालमर्यादेमध्ये पुर्ण करणे आवश्यक होते. यास्तव सदरील मे.डिझाईन बाईट या संस्थेने दिनांक २२/१०/२०२५ ते ११/११/२०२५ या कालावधीमध्ये मोठया प्रमाणात विविध समाज माध्यमांवर डिजिटलरित्या जनजागृतीपर प्रसिध्दी देणेचे काम केले. याचा महानगरपालिकेला निश्चितच मोठया प्रमाणावर फायदा झाला.

वरील काम तातडीने करावयाचे असल्याने विनाकोटेशन व बाजारभावाप्रमाणे करण्यात आलेले आहे. देयकाबाबतची कार्यवाही करावयाची असल्याने यापुर्वी प्रसिध्दी विभागामार्फत झालेल्या कामाचा कार्यारंभ आदेश जा.क्र.प्रसिध्दी ६५३दि.३/११/२०२१ नुसार तसेच जा.क्र.प्रसिध्दी विभाग ४७५/अ दिनांक २१/१०/२०२४ चे दर जी.एस.टी.वगळून आहेत. सदर दराचा आधार घेवून पुढील देयकाची मागणी करण्यात आली आहे.

या बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधी कलम ६७(क) मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

६७(क) "कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीत,जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अशा अणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये दुस-या एखादया नगरपालिका प्राधिका-याच्या किंवा (राज्य) शासनाच्या मंजुरी,मान्यता किंवा प्राधिकाराशिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही केली पाहिजे , परंतु आयुक्ताने त्यानं केलेली कार्यवाही , त्याबाबतची कारणे आणि या अधिनियमाच्या तरतुदीन्यये चालू अर्थसंकल्पीय अनुदानात समाविष्ठ नसलेला जो कोणताही खर्च अशा कार्यवाहीमुळे झाला असेल किंवा होण्याचा संभव असेल तो खर्च याविषयीचे प्रतिवृत्त स्थायी समिती व महानगरपालिका यांच्याकडे ताबडतोब पाठविले पाहिजे "

तरी उक्त तरतुदीचे अनुषंगाने अहिल्यानगर महानगरपालिकेच्या अधिकृत विविध समाजमाध्यमांवर महानगरपालिकेच्या मार्फत होणा-या स्वच्छता मोहिम तसेच दिन विशेष मा.शासनाच्या विविध योजना / अभियान तसेच महानगरपालिकेचे शास्ती माफी व इतर विविध उपक्रमांना प्रसिध्दी दिलेबाबत च्या झालेल्या कामास व सदर कामाकरीता रक्कम रूपये २२,०८,९६२/- मा.प्रशासक यांची कार्योत्तम मंजूरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकःएमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

सही/-
(यशवंत डांगे)
मा. प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**

**नगरसचिव विभाग**

**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -७४**

मा.प्रशासक ठराव क्र. ६९३ विषय क्र - ६९३

दिनांक :- १२ /१२/२०२५ विभाग- बांधकाम विभाग

---

**विषय :-** विकास भार निधीतून खर्च सन २४-२५ अंतर्गत ई नि क्र १२२३८९४-१ प्र.क्र.१ मधील नंदनवन नगर अंतर्गत भोस घर ते पाटकर घर या डि पी रस्ता विकवित करणे.निविदा मंजूरी बाबत.

**संदर्भ :-** १.आयुक्त यांची दि.१५/०९/२०२५ रोजीची

**--**--**

**ठराव :-** विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार,

१.ई निविदा क्रमांक १२२३८९४-१ सन २०२५-२६ (मनपाच्या संकेतस्थळावर ३०/०९/२०२५)

२.निविदा विक्री कालावधी : ३०/०९/२०२५ ते दि.०७/१०/२०२५

३.निविदा स्विकारणेची दिनांक ३०/०६/२०२५ ते ०७/१०/२०२५

४.निविदा उघडणेचा दिनांक ०९/१०/२०२५

५.कामाची मुदत :- ६ महिने

दि.०४/११/२०२५ रोजीच्या मा.छाननी समितीचे शिफारशीनुसार

| **ई निविदा क्रमांक** | **कामाचे नांव** | **निविदा रक्कम GST व्यतीरीक्त (सुधारीत अंदाजपत्रक)** | **निविदा दाखल करणारे ठेकेदार** | **निविदेमध्ये भरलेला दर (निविदा दरापेक्षा)** | **सर्वात कमी दराचे निविदा धारक व त्यांचा दर** |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |
| **१२२३८९४-१** | प्र.क्र.१ मधील नंदनवन नगर अंतर्गत भोस घर ते पाटकर घर या डि पी रस्ता विकवित करणे. | **३७,९१,४६२/-** | एस.एफ.शेख कंन्स्ट्रक्शन अहिल्यानगर<br>-------------------<br>श्री.निकेतन शिवाजी लोटके अहिल्यानगर | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१ % कमी दराने<br>-------------<br>अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.०० % जादा दराने | एस.एफ.शेख कंन्स्ट्रक्शन अहिल्यानगर<br><br>अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१ % कमी दराने |

वरिल तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्टया रकाना क्र. ५ मध्ये नमुद निविदा धारक श्री. एस.एफ.शेख कंन्स्ट्रक्शन,अहिल्यानगर यांची निविदा स्पर्धात्मक दृष्टया कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराने प्राप्त झालेली असून सदरचे दर वाजवी वाटत आहेत.

एस.एफ.शेख कंन्स्टक्शन,अहिल्यानगर यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराच्या निविदेस मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकःएमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (मेहेर लहारे ) | (यशवंत डांगे) |
| प्र. नगरसचिव | मा. प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपलिका | अहिल्यानगर महानगरपालिका |